**ठळक बातम्या**

- देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ
- चालू महिन्यात आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारात 22,000 कोटींहून अधिक रुपयांची परदेशी गुंतवणूक
- अंतराळात झेपावलेले उपग्रह कक्षेतच एकमेकांना जोडण्याच्या प्रयोगासाठी इसरो सज्ज
- परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून तीन दिवस कतारच्या दौऱ्यावर
- बॉर्डर-गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं भारताचा १८४ धावांनी पराभव

**आणि**

- अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचं निधन

**<><><><><>**

देशातल्या परकीय चलन साठ्यात ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची वाढ झाली आहे. त्यामुळे भारत जगात चौथ्या स्थानी पोहचला आहे. २०१४ ते २०२४ या दशकात एकूण थेट परकीय गुंतवणूक अंदाजे सातशे नऊ अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त आहे. जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांकात भारत २०१४ साली ७१व्या स्थानी होता, २०१८ साली भारत ३९ व्या स्थानी पोहचला आहे. लॉजिस्टिक्स, नवोन्मेष, सुरक्षा तसंच सायबर सुरक्षा अशा क्षेत्रांमध्ये

देशानं लक्षणीय प्रगती केली आहे. २०१५ ते २०१८ दरम्यान व्यवसाय सुलभता निर्देशांकात ४२ क्रमांकावर झेप घेतली असून भारत गुंतवणुकीसाठी एक प्रमुख केंद्र बनला आहे. २०२४ मध्ये, भारत चीननंतर जगातला दुसऱ्या क्रमांकाचा कच्च्या स्टीलचा उत्पादक देश आहे. मोबाईल फोन उत्पादनातही देशानं दुसरं स्थान मिळवलं आहे. जागतिक शैक्षणिक क्रमवारीत देशानं लक्षणीय प्रगती केली असून यावर्षीच्या क्यूएस जागतिक आशिया विद्यापीठ क्रमवारीत भारताच्या सात संस्थांनी पहिल्या १०० मध्ये स्थान मिळवलं आहे.

**<><><><><>**

विदेशी गुंतवणूकदारांनी डिसेंबरमध्ये आतापर्यंत भारतीय भांडवली बाजारात २२,००० कोटींहून अधिक रुपयांची गुंतवणूक केली आहे. डिपॉझिटरीजच्या आकडेवारीनुसार, विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात १६ हजार ६७५ कोटी रुपये आणि पत पुरवठा बाजारामध्ये ५ हजार ३५२ कोटी रुपये गुंतवले, त्यामुळं भारतीय भांडवली बाजारात एकंदर निव्वळ गुंतवणूक २२ हजार ०२७ कोटी रुपये झाली. परदेशी गुंतवणूकदारांनी नोव्हेंबरमध्ये भांडवली बाजारामधून २१ हजार ६१२ कोटी रुपये आणि ऑक्टोबरमध्ये ९४ हजार १७ कोटी रुपये काढून घेतले होते. विशेष म्हणजे, सप्टेंबरमध्ये ५७ हजार ७२४ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह भांडवली बाजारातील एफपीआयचा ओघ नऊ महिन्यातील उच्चांकी होता.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था - इस्रो आज रात्री श्रीहरिकोटा इथून दोन उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. इस्त्रोचा अग्निबाण, 476 किलोमीटरच्या वर्तुळाकार कक्षेत एस डी एक्स 01 आणि एस डी एक्स 02 या दोन उपग्रहांना स्थापित करेल. त्यानंतर अंतराळातच हे उपग्रह जोडण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे.  ही कामगिरी करणारा भारत हा जगातला चौथा देश ठरेल. केवळ अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनीच आत्तापर्यंत स्पेस डॉकिंग तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवले आहे.

ही मोहीम यशस्वी झाल्यास भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्र आघाडी  घेईल.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज दिल्लीत व्यापार आणि उद्योग जगताच्या प्रतिनिधींशी अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली. या बैठकीला वित्त, गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार यासह अनेक विभागांचे सचिव उपस्थित होते.  २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर होण्याची अपेक्षा आहे. अर्थमंत्री सीतारामन यांचा हा सलग आठवा अर्थसंकल्प असेल.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून तीन दिवस कतारच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते कतारचे प्रधानमंत्री आणि परराष्ट्र मंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुलरहमान बिन जस्सीम अल थानी यांची भेट घेतील. दोन्ही देशांदरम्यानच्या राजकीय, सांस्कृतिक, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, सुरक्षा, तसंच नागरिकांमधल्या संबंधांचा, तसंच दोन्ही देशांसाठी हितावह असलेल्या स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांचा आढावा घेणं हा या दौऱ्याचा उद्देश असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

दक्षिण कोरियातला विमान अपघात पक्ष्यामुळे झाल्याची माहिती मिळत आहे. अपघाताच्या काही मिनिटांपूर्वी विमानाला पक्ष्याची धडक बसू शकते, असा इशारा विमान नियंत्रकांनी दिला होता, अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे. अपघातातून वाचलेल्या कर्मचाऱ्यांपैकी एकानेही पक्ष्याची धडक बसल्याचा उल्लेख केला होता. मात्र, तरीही या अपघातामागच्या मूळ कारणाचा शोध अधिकारी घेत आहेत. या अपघातात आतापर्यंत १७९ जणांचा मृत्यू झाला आहे. यात १७५ प्रवासी आणि ४ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं भारताचा १८४ धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात विजयासाठी ३४० धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघानं आपल्या पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल भारतानं पहिल्या डावात ३६९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २३४ धावांमध्ये आटोपल्यानंतर सामना जिंकण्यासाठी भारतापुढे ३४० धावांचं आव्हान होतं. त्याचा पाठलाग करतांना भारताचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. भारतातर्फे यशस्वी जैस्वालनं सर्वाधिक ८४ धावा केल्या. नितीश रेड्डीचं शतक आणि जसप्रित बुमराह नं घेतलेले ५ बळी महत्त्वाचे ठरले तरी भारताला सामाना जिंकता आला नाही. ५ सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलिया २ - १ नं आघाडीवर आहे.

**<><><><><>**

हैद्राबाद इथं सुरु असलेल्या संतोष चषक फुटबॉल स्पर्धेत काल पश्चिम बंगालनं मागील उपविजेत्या सैन्यदल संघाचा ४ - २ असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली आहे. हैद्राबादच्या जीएमसी बालयोगी स्टेडियमवर काल रात्री हा सामना खेळवला गेला. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात केरळनं मणिपूरचा ५ विरुद्ध १ गोलनं पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. संतोष चषक अंतिम सामना उद्या संध्याकाळी साडेसात वाजता

हैद्राबाद इथं केरळ आणि पश्चिम बंगाल या दोन संघांमध्ये होणार आहे. पश्चिम बंगालचा संघ ४७ व्या वेळा संतोष ट्रॉफीच्या अंतिम फेरीत प्रवेश करत असून त्यांनी आतापर्यंत ३२ वेळा ही स्पर्धा जिंकली आहे.

**<><><><><>**

वरिष्ठ स्तरावरच्या पुरुषांच्या हँडबॉल राष्ट्रीय चँपियन स्पर्धेत केरळनं चंडीगढचा ३४ - ३१ नं पराभव करत विजेतेपद पटकावले. हा सामना काल केरळच्या चांगनासेरी मध्ये खेळवला गेला. केरळचा संघ पहिल्यांदाच या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. उपांत्य फेरीच्या सामन्यात सैन्यदलाचा पराभव करत केरळचा संघ अंतिम फेरीत पोहोचला होता तर चंदिगढनं भारतीय रेल्वेच्या संघाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

भारतीय हॉकी लिग स्पर्धेत आज रात्री सव्वाआठ वाजता युपी रुद्रास यांचा सामना वेदांता कलिंगा लान्सर बरोबर होणार आहे. रुरकेलाच्या बिरसा मुंडा स्टेडिअमवर हा सामना होणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांचं काल रात्री जॉर्जियातल्या प्लेन्स इथल्या निवासस्थानी निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. कार्टर हे १९७७ ते १९८१ या कालावधीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांना

२००२ मध्ये शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. ते आतापर्यंतचे सर्वात वयोवृद्ध राष्ट्रपती होते. भारताला भेट देणारे कार्टर हे अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्या सन्मानार्थ हरियाणातल्या एका गावाचं नाव कार्टरपुरी ठेवण्यात आलं. जिमी कार्टर यांनी भारत दौऱ्यावर असताना तत्कालीन प्रधानमंत्री मोरारजी देसाई यांच्यासोबत दिल्ली जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली होती. या घोषणेनं भारत-अमेरिका संबंधांचं नवं पर्व सुरू झालं.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं पश्चिम वाऱ्यांच्या प्रभावामुळं एक ते 4 जानेवारीपर्यंत हिमालयाच्या पश्चिम भागात पाऊस आणि हिमवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी डिसेंबरमध्ये हिमाचल प्रदेशात चांगला पाऊस आणि बर्फवृष्टी झाली. बर्फवृष्टीमुळे शेतकरी आणि फळबागायतदार आनंदले असून पर्यटक हिमवर्षावाचा मनमुराद आनंद घेत आहेत. तीन  राष्ट्रीय महामार्गांसह २०० हून अधिक रस्ते, बर्फवृष्टी आणि पावसानंतर पूर्णपणे बंद असून अनेक भागात किमान तापमान शून्याच्या खाली घसरलं आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये, श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक 270 किलोमीटर लांबीचा महामार्ग काल वाहनांच्या वाहतुकीसाठी पुन्हा उघडण्यात आला. वाईट हवामान आणि प्रचंड बर्फ साचल्यामुळं शुक्रवारपासून महामार्ग दोन दिवस बंद होता.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात बोईसर-तारापूर एमआयडीसीमध्ये यू. के. अरोमेटिक्स अँड केमिकल या कंपनीत काल लागलेल्या आगीत ३ कंपन्या जळून खाक झाल्या. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाने शर्थीच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवलं.

**//<><><><><>//**